Published Date:	16 Sep 2026	Publication:	Sakal (Marathi) [Pune]
Journalist:	Bureau	Page No:	11
Circulation:	539,724		



ॲग्रेसिव्ह हायब्रिड फंडांना मोठी पसंती

पुणे, ता. १५ : सध्याच्या अनिश्चिततेच्या काळात शेअर बाजारातील घसरणीपासून सुरक्षितता मिळवण्यासह गुंतवणुकीत दीर्घकालीन वाढीसाठी छोट्या गुंतवणूकदारांनी जोखीम व परतावा यांचा योग्य समतोल साधणाऱ्या ॲग्रेसिव्ह हायब्रिड फंडांकडे मोहरा वळवल्याचे दिसून येत आहे.

जुलैअखेरपर्यंत हायब्रिड फंडांच्या व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता २.६४ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे, तर जानेवारी ते जुलै या सात महिन्यांच्या कालावधीत या फंडांमध्ये १०,३४३ कोटी रुपयांची नवी गुंतवणूक झाली आहे, असे 'ॲम्फी'च्या आकडेवारीवरून समोर आले आहे. विविध ॲग्रेसिव्ह फंड योजनांमध्ये टाटा हायब्रिड ॲग्रेसिव्ह फंडाला गुंतवणूकदारांकडून मोठी पसंती मिळत असून, ३० ऑगस्टपर्यंत या फंडाच्या व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता सुमारे ४,०७० कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

या फंडात पुण्यात ऑगस्टमध्ये तब्बल २.५६ कोटी रुपयांची गुंतवणूक नोंदवली आहे. एप्रिल २०२६ मधील ८२.०१ लाख रुपयांच्या विक्रीच्या तुलनेत यामध्ये २१२ टक्क्यांची वाढ झाली आहे. तसेच, फंडाची मासिक सरासरी मालमत्ता मार्चमधील २९६ कोटी रुपयांवरून ८.९ टक्क्याने वाढून ऑगस्टमध्ये ३२२.९ कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

पुण्याच्या किरकोळ गुंतवणूकदारांमध्ये वाढलेली जागरूकता आणि बदलती आवड या आकडेवारीतून स्पष्ट होते, असे टाटा ॲसेट मॅनेजमेंटचे फंड मॅनेजर सतीश चंद्र मिश्रा यांनी सांगितले.